Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 343-350

DOI: 10.5281/zenodo.10128244

Original Research Article

# महात्मा गांधींची सत्य व अंहिसा संकल्पना

केंद्रे तिरुपती दशरथ

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हडोळती ता. अहमदपूर जि . लातूर ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: tirupatidashrathtdkendre@gmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

"स्वातंत्र्याची सुरवात तळापासून झाली पाहिजे. त्यानुसार प्रत्येक गाव एक गणतंत्र व पंच्यायत असेल आणि तिला सर्व अधिकार असतील. भारताच्या खऱ्या लोकशाहीत प्रत्येक गावाला एक घटक मानले जाईल. तिचे संचालन खालून म्हणजे प्रत्येक गावातील लोक करतील."

- महात्मा गांधी

**प्रस्तावना**

कोणत्याही सत्पुरुषाचे त्याच्याच जीवंतपणी मूल्यांकन करणे व इतिहासातिल त्याचे स्थान ठरवणे सोपी गोष्ट नसते गांधीजी एकदा म्हणाले होते माणसाच्या सुखाविषयी त्यांच्या जिवंतपणी निर्णय घेणे कठीण झाले होते सत्य .... काय आहे ? हा एक कठीण प्रश्न आहे. परंतु तुझ्या आतील आवाज जे सांगेल ते सत्य आहे. असे म्हणून माझ्यापुरता हा प्रश्न मी सोडवला आहे तुम्ही विचार कराल कि मग वेगवेगळया लोकांचे सत्य वेगवेगळे का ? कारण, असे कि मानवी मन असंख्य माध्यमांतून काम करत असल्यामुळे आणि सर्व लोकांचा मानसिक विकास एकाच गतीने होत नसल्यामुळे एक व्यक्तीकरीत जे सत्य असते, ते दुसऱ्या व्यक्ती करीत असत्या असू शकते त्यामुळे ज्यांनी हे प्रयोग केले आहेत ते या निष्कर्षावर पोहचले आहेत कि, हे प्रयोग करताना काही अटींचे पालन करणे आवश्यक आहे. अगदी नम्रतापूर्वक मी तुम्हाला सांगू इच्छितो कि ज्या व्यक्ती मध्ये भरपूर नम्रता नसेल, त्याला सत्याचा शोध लागू शकत नाही. तुम्हाला सत्यसागरात पोहायचे असेल तर तुम्ही स्वतःला शून्यवत केले पाहिजे. मी स्वतःला एक व्यावहारिक आदर्शवादी मानतो. अहिंसा धर्म केवळ ऋषीमुनींकरीता नाही. ज्या प्रमाणे हिंसा पशूचा नियम आहे, त्याच प्रमाणे अहिंसा मानवाचा नियम आहे. पशुचा आतमा सुप्त अवस्थेत असतो व त्याला केवळ शारिरीक नियम कळतात. माणसाची प्रतिष्ठा एक उच्चतर नियमाचे - आत्मशक्तीच्या

नियमाचे - पालन करण्याची अपेश्या असते जा ऋषींनी हिंसेच्या वातावरणात अहिंसेचा शोध लावला, ते न्यूटनपेक्षाही अधिक प्रतिभाशाली होते. वेलिंग्टनपेक्षाही मोठे योद्धे होते. शात्राच्या प्रयोगाचे ज्ञान असल्या नंतरही त्यांनी त्यांची निरुपयोगिता ओळखली व तुमची मुक्ती हिंसेत नाहीतर अहिंसेच्या आहे. असे त्यांनी जगाला सांगितले. एकदा व्हाईस रॉय लार्ड कर्झन म्हणाला कि सत्य हि संकल्पना युरोपमधून भारतमध्ये आली. या वर गांधीजी संतप्त झाले व ते म्हणले, तुमचा विचार चुकीचा आहे भारतमध्ये सत्याची प्रतिष्ठा प्राचीन काळापासून आहे. सत्याला परमात्म्याचे रूप मानले जाते. अहिंसेला साधन म्हणून ठेऊन आपण अंतिम सत्याची प्राप्ती करू शकतो गांधींनीं त्यांच्या आदर्श समाजाची व्याख्या " रामराज्य " अशी केली. हा एक समाज म्हणून कल्पित आहे जिथे सत्याचा विजय होतो, लोक नैतिक आणि अध्यात्मित जीवन जगतात आणि नाहीसे होतात. अशा या राष्ट्रपित्याचा जन्म इ. सन २ ऑक्टोबर १८६९ मध्ये पोरबंदर गुजरात येथे झाला आणि त्यांचा मृत्यू ३० जानेवारी १९४८ मध्ये दिल्ली येथे झाला. ते राष्ट्रपिता, भारतीय वकील, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक होते. ते ब्रिटिशाविरुद्ध राष्ट्रवादी चळवळीचे नेते होते.

**संशोधन विषयाचे महत्व**

प्रस्तुत संहोधन विषयाचे विविधांगी महत्व आहे पहिली मुक्या गोष्ट म्हणजे सत्याला बोलण्याची गरज पडत नाही ते आपल्या कृतीतून दिसते सत्याची कास धरल्यास मानवाचा विकास होईल. सत्य व अहिंसा यामध्ये आपण सहिष्णू असले पाहिजे. हिंसेचा अवलंब न करता वाईटाचा प्रति कर करू शकतो म्हणून अहिंसा महत्वाची आहे. वाईटाला विरोध केला पाहिजे, वाईट कृत्य करण्याचा लोकांना नाही. त्यामुळे अहिंसेला महत्व आहे सत्य आणि अहिंसा हे शत्रू किंवा विरोधक नसतात. वरील कारणामुळे सत्य व अहिंसा याचे संशोधन करणे महत्वाचे आहे.

**संशोधनाची उध्दीष्टे**

प्रस्तुत संशोधन करताना काही समोर उद्दिष्टे ठेऊन ते पूर्ण करण्याचा हेतू आहे संशोधन करताना आपले काही उद्दिष्टे नसतील तर संशोधन करण्याला काहीही अर्थ राहणार नाही म्हणून संशोधनासाठी उद्दिष्टे हे आवश्यक घटक आहे.

१. महात्मा गांधीजींच्या सत्य संकल्पनेचा अभयास करणे
२. महात्मा गांधी यांनी जे सत्य सांगितले आहे त्याचा दुर्ष्टीकोन आहे त्याचा अभ्यास करणे
३. अहिंसा तत्वाची जैन धर्मानंमध्ये अतिशय बारकाईने त्याची माहिती दिली आहे
४. एखाद्या जीवाचा वध करणे किंवा त्याला दुःख देणे म्हणजे अहिंसा पन हि विचार भावना मानवाच्या मनात का येते त्याची माहिती घेणे
५. अहिंसा मैत्री आणि समजुदारपणा जिकंण्याचा प्रयत्न करते यामुळे सर्व काही साध्य होऊ शकते म्हणून हे एक उध्दीष्टे सांगता येते

**संशोधनाची गृहीतके**

१. सत्यचा दिव्य संदेश काय आहे
२. सत्य हे ईश्वर आहे का याचा अभ्यास करणे
३. सत्य आणि सैंदर्य यातील संबंध काय आहे
४. अहिंसेची शक्ती कशामध्ये आहे आणि त्याचा जीवनामध्ये काय फायदा होतो
५. अहिंसेची आमल करताना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजे
६. अहिंसा हि समाजाला कोणत्याहि उद्दिष्ट पोटी मद्दत करत असते आणि अहिंसे मुळे समाज बरोबरच राज्याचा विकास करतो

**सत्य व अहिंसा यांची संकल्पना**

**१. सत्याचा दिव्य संदेश**

माझ्या करीता सत्य सर्वोच्य सिद्धांत आहे यात अनेक सिद्धांत समाविष्ठ आहेत. हे सत्य केवळ शाब्दिक सत्य नाहीं तर विचारातील सत्यही आहे तसेच हे सत्य आमच्या संकल्पनेतील केवळ सापेक्ष सत्य नाही तर संपूर्ण सत्य चिरंतन सत्य आहे हे सत्यच ईश्वर आहे, ईश्वराच्या अगणित रूपात होत असते सत्याची ती असंध्यरूपे पाहून मी भयभीत होतो आणि क्षणभर स्तंभीत होतो परंतु मी ईश्वराची पूजा केवळ सत्याचा रूपातच करता असतो अजून मला त्याचा शोध लागू शकला नाही परंतु मी निरंतर मी त्याच्या शोधात आहे या शोधात मी माझ्या सर्वाधिक प्रिय गोष्टींचा त्याग करायला तयार आहे त्याच्या करीत मला प्राणत्याग करण्याची वेळ आली तरी मला आशा आहे कि मी त्याकाररिता तयार असें परंतु जोपर्यंत या निरपेश्या सत्याची प्राप्ती प्रपत्ती होत नाहि तोपर्यंत मला जाणवलेल्या सत्यावरच अवलंबून राहावे लागेल तोपर्येत ते सापेक्ष सत्य माझा दीपस्तंभ असेल माझी ढाल असेल माझ्या करीत जे शक्या आहे ते एखाद्या लहान मुलं करीत सुद्धा शक्य आहे हि गोष्ट मला अजून तीव्रपणे जाणवू लागली आहे हे मी सबळ पुराव्याचा आधारावर सांगत आहे सत्याच्या शोधाची साधने जेवढे कठीण आहेत तेवढेच सोपेही आहे अहंकारी व्यक्तीला जे कठीण वाटू शकते आणि निरागस मुलाला सोपे. सत्य शोधक हा धूलिकानापेक्षाही विनम्र असला पाहिजे जग धुळीला पायाखाली तुडवतो परंतु सत्यशोधक इतका नम्र असला पाहिजे कि धुलकणांनाही त्याला चिरडणे शक्य व्हावे तेव्हा आणि तेव्हाच सत्याचे दर्शन शक्य आहे सत्य एखाद्या विशाल वृक्षासारखे आहे तुम्ही त्यांचे जितके संगोपन कराल तितकीच तो अधिक फळे देईल सत्याच्या खाणीला तुम्ही जसेजसे खोदतजल तसेतसे ती सेवेच्या नवनव्या स्वरूपातील हिरेजवाहिर देते. माझ्या अनुभवाने माज़ीखतरी पातळी आहे कि सत्याशिवाय दुसरा कोणताच ईश्वर नाही. सत्याचे जे ओझरते दर्शन मला घडले आहे त्यामुळे त्याच्या अवर्णनीय तेजाचे वर्णन करणे शक्य नाही आपण दररोज पाहत असलेल्या सूर्याच्या तेजापक्षही सत्याचे तेज लक्ष्यवधीपट अधिक प्रखर आहे. खरे पाहता त्यातुल प्रकाशाच्या मला केवळ कवदासच पाहायला मिळाला आहे परंतु माझ्या सर्व प्रयोगाच्या आधारावर मी खातरीपूर्वक सांगूशकतो कि सत्याचे परिपूर्ण दर्शन संपूर्ण पने अहिंसेचे अनुसरण केल्यानंतरच होऊ शकते.

**२. सत्य ईश्वर आहे**

अशी एक शक्ती आहे जिची व्याख्या करता येणार नाही व ती सर्वव्यापी आहे माला जरी ती दिसत नसली तरी मला ती जाणवते, हि अदृश्य शक्ती मला जाणवते. परंतु तिचा पुरावा देता येणे शक्य नाही कारण ती इंद्रिय संवेदे वस्तूपेक्षा अगदी भिन्न आहे ती इंद्रियातीत आहे. तरीही ईश्वराच्या अस्तित्वा विषयी काही प्रमाणात तर्क करता येतो. मला माहित आहे कि, जर मी वाईट पनाशी संघर्ष केला नाही व या संघर्षात प्राण पनाला लावले नाही तर ईश्वर काय आहे. हे मला कधीच कळणार नाही. माझ्या सामान्य आणि मर्यादित अनुभवाने माझा हा विश्वास अजूनच द्रढ झाला आहे जितका शुद्ध होण्याचा प्रयत्न करतो, तेवढाच मी ईश्वर जवळ गेलो असल्याचा मला अनुभव होतो. आजच्या सारखी माझी श्रद्धा केवळ निमित्त मात्र राहणार नाही उलट पक्षी जेव्हा ती हिमाल्याच्या बर्फाच्यादीत शिखरा प्रमाणे दैदिव्यमान आणि अढळ होईल, तेव्हा मी ईश्वराच्या किती जवळ पोहोचलेलो असेल. जगाच्या संकल्पनेचा त्याग करून सुद्धा मी राहू शकतो. परंतु ईश्वराच्या संकल्पनेच्या त्यागाचा मी विचारही करू शकत नाही मला माहित आहे कि मी काहीही करू शकत नाही ईश्वर सर्व काही करू शकतो हे देवा तू मला तुझे उचित साधन बनव आणि तुझ्या इच्छेप्रमाणे माझा उपयोग करून घे माझ्या करीता ईश्वर सत्य आणि प्रेम आहे, ईश्वर नैतिकता आणि सदाचार आहे ईश्वर निर्भयपणा आहे ईश्वर प्रकाश आणि जीवन यांचे मूळ आहे आणि तरीही तो या सर्वांच्या पलीकडे आहे. ईश्वर जाणीव आहे एवढेच नाही तर

आपल्या असीम प्रेमाच्या छायेत आहे तो नास्तिकाला हि राहू देत असल्या मुळे तो नास्तिकांचा नास्तिकपणाही आहे. तो आपली अंतःकरणे चाचपडत असतो तो वाणी आणि तर्क यांच्या पलीकडे आहे तो आपल्याला आणि आपल्या अंतः करनाला आपल्या पेक्षाही अधिक चांगला ओळखतो. तो आपले म्हणणे शब्धशहा घेत नाही कारण अनेकदा कळत वा नकळत आपण जे बोललो तसा त्याचा अर्थ नसतो

### ३. सत्य आणि सौंदर्य

कोणत्याही वस्तूच्या दोन बाजू असतात ... बाह्य आणि अंतर्गत, बाह्य बाजूचा उपयोग अंतर्गत बाजूला मदत करणे येवढाच असतो अश्या प्रकारची खरी कला आत्म्याची अभिव्यक्ती असते बाह्य रूपाची उपयोगीता माणसाच्या अंतरिक भावनांची अभिव्यक्ती करणे हिच आहे. मला माहित आहे कि, काही लोक स्वतःला कलाकार म्हणून घेतात आणि त्यांना तशी मान्यताहि असते. परंतु तरीही त्यांच्या कलाकृतीत आत्म्याच्या उर्धव गामी आकांशाची आणि त्यांच्या अस्वस्थतेची नामात्रहि चित्रण नसते सत्याचा शोध हीच पहिली गोष्ट त्यानंतर त्यात सौंदर्य आणि चांगुलपणा यांची भर पडू शकेल माझ्या मते यशु हा सर्वश्रेष्ठ कलाकार होता कारण त्याला सत्य दर्शन झाले होते आणि त्याने ते अभिव्यक्तही केले होते त्याच प्रमाणे आरबी भाषेतील कुरान हि सर्वक्षेष्ठ रचना आहे असे विद्वान लोक सांगत असल्या मुळे तीच गोष्ट महादाचीही आहे या दोघांनीही आधी सत्य शोधण्या करिता धडपड केली होती मी सत्यामध्ये वा सत्याच्या माध्यमातून सौंदर्यचा शोध घेत असतो सत्याची सर्व रूपे केवळ सत्य विचारच नाही तर खरे चित्र आणि गाणी हि सुंदर असतात. सामान्यपणे लोक सत्यात सौंदर्य पाहू शकत नाहीत सामान्य माणूस त्या पासून दूर पाळतो आणि त्यामूळे सौंदर्य पाहण्याचिं क्षमता सुद्धा तो हरहुन बसतो. लोक जेव्हा सत्यात सौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतील तेव्हा खऱ्या कलेचं उदय होईल खऱ्या कलावंताच्या दृष्टीने तोच चेहरा सुंदर असतो जो आपल्या बाहय रूप पेक्ष्या वेगळया आत्म्यातील सत्याच्या प्रकाशने दैदिप्य माण झालेला आहे याहून वेगेळे कोणतेच सौंदर्य नाहीं या उलट सत्य अश्या अनेक स्वरूपात अभिव्यक्त होऊ शकते जे बाहेत सुंदर नाही असे म्हणतात कि स्वक्रेटिस आपल्या काळातील सर्वात सत्यनिष्ठ माणुस होता. परंतु त्याचा चेहरा ग्रीस मध्ये सर्वात कुरूप होता कारण त्याने आयुष्य भर सत्यसाठी संघर्ष केला.

### ४. अहिंसेची शक्ती

मला केवळ मार्ग माहित आहे अंहिसेचा . हिंसेचा मार्ग माझ्या स्वभावाविरुद्ध आहे. हिंसेचा पाठ शिकविण्याऱ्या शक्तींना मी वाढवू इच्छित नाही ... माझी श्रद्धा मला आश्वस्त करते कि, ईश्वर निराधारांचा आधार आहे, आणि तो संकटात तेव्हाच मदद करतो जेंव्हा व्यक्ती स्वतःच्या त्याच्या दयेवर सोडून देतो. या श्रद्धेमुळे मी अशी आशा करतो कि एक ना एक दिवस तो मला आसा मार्ग दाखवील ज्यावर चालण्याचा आग्रह मी माझ्या देशवासियांना करू शकेल. अंहिसा मानव जातीचा नियम आहे. आणि तो पाशवी शक्तीपेक्षा कितीहि महान आणि श्रेष्ठ आहे. प्रेमाच्या ईश्वरावर ज्याची जिवंत श्रद्धा नाही. त्याच्या करीता हा नियम नाही अंहिसा मानवाच्या स्वाभिमानाचे आणि आत्मसन्मानाचे पूर्णपणे रक्षण करते. परंतु ती जमीन जुमला व चालसंपत्ती यांच्या मालकीचे नेहमीच रक्षण करीत नाही जेवढे मात्र खरे आहे कि सशक्त माणूस ठेवण्यापेक्षा अंहिसापालनाची सवय केल्यास संपत्तीचे रक्षण सुद्धा अधिक चांगले होते. अंहिसेचा स्वभावच संपत्तीचे रक्षण सुद्धा अधिक चांगले होते. अंहिसेचा स्वभावच आसा आहे कि, ते चुकीच्या मार्गाने कमावलेल्या फायद्याचे आणि अनैतिक कृत्यांचे रक्षण करण्या करीत मदत करत नाहीत. अंहिसेच्या मार्गावर चालणाऱ्या व्यक्तींनी आणि राष्ट्रांनी आपली प्रतिष्ठा सोडून बाकी सर्व गोष्टींचे बलिदान करण्याची तयारी ठेवली पाहिजे. आपल्या गतिमान अवस्थेत अंहिसेचा अर्थ आहे जाणीवपूर्वक व्यथा सहन करणे. अंहिसेचा अर्थ वाईट वागण्यारांच्या इच्छे समोर विनम्र आत्मसमर्पण करणे नसून त्या विरुद्ध आपल्या संपूर्ण आत्मशक्तीच्या उपयोग करणे हा आहे. मानव जातीच्या या नियमाप्रमाणे आचलन करत असताना एकटा माणूस सुद्धा आपला सन्मान, धर्म, आणि आत्मा यांच्या रक्षणाकरिता एखाद्या आणखी साम्राज्यालाही

तोंड देऊ शकतो आणि त्या साम्राज्याच्या पथनाचा वा पुनर्द्धाराचा पाया घालवू शकतो. अंहिसेच्या माझ्या संकल्पने नुसार, अंहिसा हि दुप्पटपना आणि बदलण्याची भावना यांच्या विरुद्ध संघर्ष करणारी अधिक सक्रिय शक्ती आहे. या मुळे अनैकतेला मी मानसिक आणि नैक्तिक विरोधाने संपवू इच्छितो, अत्याचारी माणसाच्या तलवारीची धार त्यापेक्षाहि अधिक धारदार शास्त्राने मी बोथट करू इच्छित नाही, तर शारीरिक शक्तीने प्रतिकार करण्याच्याची त्याची इच्छाच मी धुळीला मिळवू इच्छितो. माणसाला उपलब्ध असलेली सर्वात मोठी शक्ती अंहिसा आहे. माणसाने आपल्या कौशल्याने विनाशाची जी मोठ्यात मोठी शस्त्रे बनवले आहेत. त्यांच्यावूनही अंहिसा अधिक शक्तिशाली आहे. विनाश मानवांचा नियम नाही म्हणून आपल्या भावाला मारून नाही तर त्याच्या हाताने मरण्याची तयारी ठेवून मोकळेपणाने जगत असतो. प्रत्येक जण वा इतरांना केलीली इजा या गोष्ट कोणत्याही कारणाकरिता केलेल्या असेना मानवतेच्या विरोधातील अपराध असतात अंहिसा एक विज्ञान आहे. विज्ञानाच्या शब्द कोशात पराभव हा शब्दच नसतो. अपेक्षित परिणाम प्राप्त घेऊ शकेल नाहीं तर ती गोष्ट नवीन शोधाची पूर्वपीठिका असते.

**५. अहिंसेची अमलबजावणी**

लक्ष्यात आले होते कि अहींसा हा गुण व्यक्ती करीता केवळ शांतता आणि मोक्ष प्राप्ती यांच्या करिताच आवश्यक असलेला गुण नाही तो सामाजिक आचरणाचा नियम आहे समाजाला जर मानवी प्रतिष्ठेने जगण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची आपली युगांची तहान भागवायची असेल तर त्याने या गुणाचे आचरण केले पाहिजे. दैनंदिन व्यहारात / जीवनात अहिंसेचे अचरण केल्यानेच तिची खरी किंमत कळू शकते. तिच्या मुळे पृथ्वी स्वर्ग बनते वास्तवात परलोकासारखी कोणतीही गोष्ट अस्तित्वात नाही. सर्व जग एकच आहे कोणी इथे आणि कोणी तिथे असं काही प्रकार नाही.

**६. अहिंसक समाज**

मी अहिंसेला केवळ व्यक्तीगत सद्गुण समजत नाही हा एक सामाजिक सद्गुणही आणि इतर सतगुणाप्रमाणेच याचा विकास केला पाहिजे. हे खरे आहे कि समाजाचे पारस्परिक व्यवहार बहुधा अहिंसेच्या अभिव्यक्तीनेच प्रेरित होऊन चालत असतात मला केवळ एवढेच सांगायचे आहे कि, अहिंसेचा उपयोग आनखी मोठ्या प्रमाणावर म्हणजे राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर व्हायला पाहिजे. जा प्रमाणे पृथ्वी गुरुत्वाकर्षच्या प्रभावाने आपल्या कक्षेत स्थिर आहे. त्याच प्रमाणे संपूर्ण समाज अहिंसेच्या सूत्रात बांधलेला आहे अहिंसेवर आधारित समज अशाच गटांचं असू शकतो, जे स्वच्छपूर्वक सहकार्य व सन्मानीय आणि शांततापूर्वक सहअस्तित्व या अटीवर गावात राहतात. सरकार सर्व लोकांच्या प्रतिनिधित्व करत असल्या मुळे संपूर्ण अहिंसेवर आधारित सरकार येशश्वी होऊ शकत नाही तश्या प्रकारच्या अस्वर्णयुगाची मी आज कल्पना करू शकत नाही. परंतु प्रामुख्याने अहिंसेवर आधारित समाजाची कल्पना मात्र मी आज नक्कीच करू शकतो आणि त्याकरिता मी प्रयत्नशील आहे. आदर्श समाजत सरकार नावाची काही गोष्ट असली पाहिजे कि नाही हा प्रश्न उरतोच. त्यावेल्ली त्या गोष्टीची काळजी करण्याची गरज नाही असे मला वाटते. परंतु अश्या समाजाकरिता आपल्याला कंकराय्चे असेल तर तो तेवढ्याच प्रमाणात अस्तित्वात येईल जेवढ्या लोकांना त्याचा लाभ होईल. जगात कोठेही सरकार शिवाय राष्ट्र अस्तित्वात नाही हि गोष्ट आपण लक्षत ठेवली पाहीजे. परंतु असे राष्ट्र कधी काळी अस्तित्वात येणारच असेल तर ते भारतकडून होऊ शकले.

**७. अहींसक राज्य**

तुम्ही समजला किंवा संमूहाला अहिंसा शिकवू शकत नाही. ती केवळ व्यक्ती करिता व तीही अगदी अपवादात्मक प्रकरणी शक्य आहे. असे म्हणून अनेक लोक्कानी हात झटकले आहेत. माझ्या मतेही फार आत्मवचंना आहे मानव जात जर

स्वभावतः अहिंसक नसती तर युगांमपूर्वीच तिने स्वतःचा नाश करून घेतला असता परंतु हिंसा आणि अहिंसेच्या द्वंद्ववात अंतिमतहा अहिंसेचा नेहमीच विजय झालेला आहे. आदर्श राज्यात कोणतेही सत्ता नसते कारण तीथे कोणतेही राज्य नसते परंतु जिवनातं कधीही पूर्णपणे आदर्श सध्या होत नसते त्यामुळे थोरांच्या अभिजात वाचनप्रमाणे जे शाशन किमान शासन करते ते शाशन सर्वोकृष्ट असते. अहिंसेवर आधारित स्वराजात लोकांना आपल्या अधिकाराची जानिव असण्याची गरज नसते त्यांना आपल्या कर्तव्याचे भान असते कि तेवढे पुरे होते त्यामुळे खऱ्या नागरिकाचे हक्कात च्याच नगिरकांकरिता असतात जे त्या राज्याबद्दलच्या कर्तव्याची परिपूर्ती करतात आणि सह्या प्रकारे मिळालेल्या हक्कानं तेच न्याय देऊ शकतात. प्रत्येकाला खोटे बोलण्याचं व गुद्देगिरी करण्याच्या अधिकार आहे परंतु या हक्कच वापर करण्या करीत आणि समाजा करतात हा अधिकार हानिकारक आहे. परंतु या जो सत्य आणि अहिंसेचे पालन करतो त्याला प्रतिष्टा मिळते आणि प्रतिष्टे मुळे अधिकारही मिळतात आणि; लोकांना कर्तव्य केल्या मुळे अधिकार मिळतात ते लोक आपल्या अधिकारांचा उपयोग केवळ समाज सेवेसाठीच करत असतात स्वतः करीत कधीही नाही. लोकराज्य म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वराज्य आणि समाजातील घटक म्हणून जेव्हा प्रत्येक नागरिक आपले कर्तव्य पारपडतो तेव्हाच असे स्वराज्य येते.

### ८. अहिंसा आणि आतंकवाद

माझा अनुभव मला शिकारवतो कि हिंसेचा अवलंब करून सत्य कधीही प्रथापित करता येऊ शकत नाही. ज्यांचं आपल्या सध्याच्या न्यायिचित्तेवर विश्वास आहे जे गुन्हेगारी स्वरूपाचं कायदेभंग काधीही करू शकत नाहीत. त्यांनी असीम धेर्य ठेवणे जरुरीचे असते आणि तेच लोक सविनय कायदेभंग करू शकतात. माझा शास्त्र उठवावर विश्वास नाही ज्या व्याधींवरील उपाय म्हणून त्याचा उपयोग करण्यात येतो त्यापेक्षाही हा उपाय भयानक आहे. बदला, उतावळेपणा आणि संताप यांचे हे चिन्ह आहे. हिंसेचा मार्ग दीर्घकालीन दृष्टीने कधीही हितावह होऊ शकत नाही. देश्याच्या स्वतंत्र करीता प्रयन्त करणाऱ्याच्या रक्ताने इतिहाची पाने रंगलेली आहेत. कठोर परिश्रम केल्या शिवाय एकही राष्ट्राने आपला उधार केल्या असल्याचे उद्धरण मला माहित नाही. स्वराज्याचे वेड लागलेल्या लोकांनीं हत्या करणाऱ्याची काट्यार, विषाचा प्याला, बंदूक धैर्याची गोळी, भाला इत्यादी ... सर्व साधनांचा आधार घेतलेला आहे. इ आतंकवाद्यच्या समर्थन करू शकत नाही.

### ९. भारत आणि अहिंसक मार्ग

भारत जर हिंसेच्या शक्तीचे उदात्तकरन करण्याची पधती शोधु शकला आणि परसपर विरोधी हितातील भेद नाहीसे करून रचनात्मक व शांतता पूर्ण पद्धतीत त्यात परिवर्तन करू शक्ला तर ती फार मोठी स्वभाग्याची गोष्ट होईल. अहंसक पद्धतीने स्वतंत्र झालेल्या भारतात अपराध तर होतील परंतु अपराधी असणार नाहीत. इतर विकार प्रमाणेच अपराधी एक रोग आहे आणि तो आजच्या सामाजिक व्यवस्थेतून निर्माण झाला आहे यामुळे खुणा सह प्रत्येक अप्रधकडे रोग म्हणून पहिले जाईल. अस भारत कधी अस्तित्वात येईल कि नाही हि वेगळी गोष्ट आहे. स्वराज्यात माला आणि तुम्हाला असे पोलिसदल मिळेल जे अनुशाहीत असले आणि बुद्धी मनही असेल. मी अथवा अजून कोणी या शक्तींशी सामना करण्याची याहून चांगली पद्धत शोधून काडली नाही तर ते आंतरिक व्यवस्थेची काळजी घेईल आणि बाहेरून हल्ला करण्याचाही सामना करील.

**१०. भारत आणि हिंसक मार्ग**

भारत जर तलवारीचा सिद्धांत अनुसरणार असेल तर शक्य आहे कि त्याला क्षणिक विजय मिळेल. परंतु आशा अवस्थेतभारत बद्दल मला आभिमान वाटणार नाही. मी भारताशी या करीता बांधलेलो आहे कि माझ्या जवळ एक संदेश आहे यावर माझा विश्वास आहे त्याने युरोपचे अंधानुकरण करू नये. भारताने तलवारीचा सिद्धांत स्वीकारला तर तो क्षण माझ्या परीक्षेचा क्षण असेल. मला आशा आहे कि मी त्यात उत्तीर्ण होईल. माझ्या धर्माला कोणत्या हि भौगोलिक सीमा नाहीत. जर माझ्यात त्या धर्म बद्दल जिवंत श्रद्धा सेल तर ती भारतावरील माझ्या प्रेमावरही अतिक्रमण करू शकेल. अंहिसेच्या माध्यमातून भारताची सेवा करण्याकरिता माझे जीवन समर्पित आहे. संपूर्ण भारताने हिंसा न करता अंहिसेच्या मार्गाने शांततेच्या शाश्वत नियमांचा सीव्हीकर केला तर तो खरोखरच संपूर्ण विश्वाचा निर्विवाद नेता बनेल.

**निष्कर्ष**

१. सत्य, अहिंसा आणि शांतीचा मार्ग अवघ्या जगाला दाखिवणाऱ्या महात्मा गांधी यांचे विचार आजहि जगाला प्रेरानादायक आणि मार्गदर्शक आहेत.
२. सत्य म्हणजे खरे बोलणे किंव्हा खोटेपना, फसवणूक यापासून दूर राहणे आसा अर्थ आपण घेतो मात्र गांधीची सत्याची कल्पना हि निव्वळ खरे बोलण्याने साकार होत नाही. त्यात जीवनाविषयीचा सखोल दृष्टिकोन आहे असे ते म्हणतात.
३. महात्मा गांधी हे तत्वनिष्ठ होते. गांधीजींनी आव्यूशभर जी तत्वे पाळली आणि शिकवली, ती म्हणजे अंहिसा, सत्य, भर्मचाऱ्या, अस्तेय, अपरिग्रह, शरीरश्रम, आस्वाद, अभय, सर्वधर्म, सामंताव, स्वदेशी व अस्प्रश्यता निर्वाण हि ती आकरा तत्वे आहेत. वरील प्रकारे निष्कर्ष सांगता येतात.

**समारोप**

गांधीजी म्हणतात कि सत्य हे साध्य आहे पण त्याचे साधन अंहिसा आहे. हि दोन सामाजिक राजकीय शास्त्रे होती जी त्याने आपले ध्येय साध्य करण्यासाठी वापरली. गांधी म्हणतात कि, सत्य आणि अंहिसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि ते अंहिसेला साधन मानतात आणि शेवट म्हणून सत्य.

महात्मा गांधीच्या तत्वज्ञाचा जो पाया आहे तो म्हणजे सत्य आणि अंहिसा होय. गांधींजींच्या च्या मते अंहिसा म्हणजे दुःखात न करणे अंहिसा, अपाय न करणे जीवे मारण्याच्या इच्छेचा त्याग आणि कोणत्याही जिवंत वस्तूला दुखापत करण्याचा हेतू विरोधी विचार शब्द किंवा कृती पासून दूर राहणे आणि सर्व सजीव प्राण्याबद्दल करुणा बाळगणे. गांधीजींना सत्य आणि अंहिसा याची प्रेरणा कुणाकडू मिळाली असेल तर ती म्हणजे राजचंद्र राऊजी भाई यांच्या कडून मिळाले. लिओ टॉल्सटाय यांनी लिहलेल्या द किंग्डम ऑफ गॉड इज विदिन यू या पुस्तकातून त्यांना अंहिसेची प्रेरणा मिळाली.

सत्याला बोलण्याची गरज पडत नाही ती आपल्या कृतीतून दिसते. सत्याची कास धरल्याशिवाय मानवाचा नक्की विकास होईल. केवळ जीव हिंसा न करणे या बरोबरच आपल्या धर्माइतकेच इतर धर्मालाहि महत्व देणे म्हणजे अंहिसा होय. महात्मा गांधी असे म्हणायचे कि, मी अगदी एकटा जरी उरलो तरी कारण तेच सगळयात शक्तिदायक साहस आहे. ज्याच्या समोर अणुबॉम्ब देखील निष्प्रभ होतो. महात्मा गांधींचे सुवचन अर्थात सत्य व अंहिसा हि दोन मूल्य मानवी जीवनाच्या उथाणासाठीचा प्रेरक बिंदू आहेत. हे मात्र गांधीजींच्या सत्याचे प्रयोग असलेल्या पुस्तकातून जीवन चरित्रातून प्रकट होत आहे. महात्मा गांधी दीनदुबळया सेवेला ते ईश्वर मानायचे आणि त्या ईश्वरालाच सत्य मानायचे. या सत्याचे

पूजन ते अंहिसेच्या तत्वाने करायचे ते असे म्हणायचे कि सत्य व अंहिसा हि मूल्य भारतीय धर्मसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

**संदर्भ सूची**

१. सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
२. हरिजन - महात्मा गांधी
३. यंग इंडिया - महात्मा गांधी
४. महात्मा गांधींचे विचार - आर. के. प्रभू
५. पंचायत राज - महात्मा गांधी